स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच्.डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०-२५६२२६८८/८९
: ०२०-२५६२२६९०/९१
: ०२०-२५६२२६९२
: ०२०-२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२६—२७/३३५ दि. ०२/११/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय: महाविद्यालयांमध्ये एचआयव्ही/एड्स जनजागृती करण्याकरिता रेड रिबन क्लबची स्थापना करण्याबाबत...

संदर्भ: १.मा. राज्य संपर्क अधिकारी, रासेयो, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांचे क्रमांक:रासेयो—२०२६/प्र.क्र.१०१/रासेयो कक्ष, दि.२८ ऑक्टोबर, २०२६ रोजीचे पत्र

महोदय,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रान्वये एड्सवर पूर्णत्वाने मात करण्याकरिता कोणतेही औषध वा लस अद्यापही उपलब्ध नसल्यामुळे या रोगाला प्रतिबंध करणे हाच एकमेव उपाय सध्या उपलब्ध आहे. या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी भारतात केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम सन १९९२ पासून राबविण्यात येत आहे.

त्यानुसार आपल्या महाविद्यालयामधील रेड रिबन क्लबद्वारे एचआयव्ही/एड्स जनजागृती करण्यात यावी. ज्या महाविद्यालयांमध्ये अद्यापही रेड रिबन क्लबची स्थापना केली नसेल अशा महाविद्यालयांनी स्थापना करावी. तसेच याबाबतचा अहवाल BOD लॉगीनमध्ये NSS - Gov Other Reports - Add New - योजना/उपक्रम निवडा यामध्ये उपक्रमाचे नाव **"रेड रिबन क्लब २०२६"** या विषयाची निवड करून सादर करण्यात यावा. अहवाल सादर करताना 'संक्षिप्त अहवाल/अभिप्राय/टिपणी/ प्रतिक्रीया' याठिकाणी खालील नमुन्याप्रमाणे माहिती सादर करावी.

१. रेड रिबन क्लबची स्थापना दिनांक —
२. रेड रिबन क्लब समन्वयकांचे नाव —
३. रेड रिबन क्लब समन्वयकांचा संपर्क क्रमांक —
४. रेड रिबन क्लब विद्यार्थी सदस्यांची संख्या —
५. रेड रिबन क्लबमार्फत राबविण्यात उपक्रमांची माहिती —
६. रेड रिबन क्लब प्रस्तावित उपक्रमांची माहिती —

सदर उपक्रमाचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबत जोडले आहे. कळावे, ही विनंती.

संचालक(अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : वरिल संदर्भीय पत्र

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.
ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र. ०२२-२२६७९५६५

क्रमांक: रासेयो-२०२६/प्र.क्र. १०१ /रासेयो कक्ष दिनांक : २८ ऑक्टोंबर, २०२६

प्रति,

कार्यक्रम समन्वयक तथा संचालक रासेयो संलग्नित,
सर्व राज्य सार्वजनिक विद्यापीठे/अभिमत विद्यापीठे/संचालनालये,
महाराष्ट्र राज्य.

विषय :- महाराष्ट्रातील सर्व राष्ट्रीय सेवा योजना युनिट असलेल्या महाविद्यालयांमध्ये एचआयव्ही / एड्स जनजागृती करण्याकरिता रेड रिबन क्लब (आरआरसी) ची स्थापना करण्याबाबत.

संदर्भ:- आयुक्त, शहरी आरोग्य तथा प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई यांचे जा.क्र. मराएनिसं / माशिसं / आरआरसी / २६-२७ / ७९३२-३५, दि. २१.१०.२०२६.

उपरोक्त विषयांकीत संदर्भाधीन पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

२. राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) अंतर्गत आपल्या विद्यापीठाशी संलग्न असलेल्या ज्या महाविद्यालयांमध्ये एचआयव्ही / एड्स जनजागृती करण्याकरिता रेड रिबन क्लब (आरआरसी) ची स्थापना केली आहे त्या महाविद्यालयांनी रेड रिबन क्लबची स्थापना दिनांक, समन्वयकाचे नाव व संपर्क क्रमांक, विद्यार्थी सदस्यांची संख्या, राबविण्यात आलेले व प्रस्तावित उपक्रम तसेच संबंधित आदेशाची प्रत नमूद करावी.

३. ज्या महाविद्यालयांमध्ये एचआयव्ही / एड्स जनजागृती करण्याकरिता रेड रिबन क्लब (आरआरसी) ची स्थापना केली नाही त्या महाविद्यालयांनी रेड रिबन क्लब स्थापन करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा.

(डॉ.मिलिंद काळे)
राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन

प्रत:- १. मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२ मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
३ क्षेत्रिय संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, रासेयो क्षेत्रिय संचलनालय (महाराष्ट्र व गोवा), पुणे.
४ सह सचिव, रासेया कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
५ निवडनस्ती, रासेयो कक्ष.

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था
(महाराष्ट्र शासन)
आर.ए.किडवाई मार्ग, ॲकवर्थ लेप्रसी कॉम्पलेक्स,
वडाळा(प.) मुंबई-४०००३१

जा.क्र.मराएनिसं/माशिसं/आरआरसी/२६-२७ /7932-35
दिनांक-२१ /१०/२०२६

प्रति,

राज्य संपर्क अधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना (एन एस एस),
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर,
महापालिका मार्ग, धोबी तलाव,
मुंबई - ४००००१.

विषयः महाराष्ट्रातील सर्व राष्ट्रीय सेवा योजना युनिट असलेल्या महाविद्यालयांमध्ये एचआयव्ही / एड्स जनजागृती करण्याकरिता रेड रिबन क्लब (आरआरसी) ची स्थापन करण्याबाबत..

संदर्भ : १) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे क्र.मराएनिसं/माशिसं/आरआरसी/२५-२६/४६४९- ८१ दि. १६.०९.२०२५ चे पत्र
२) मा.सचिव, विश्वविद्यालय अनुदान आयोग (UGC), शिक्षा मंत्रालय, भारत सरकार यांचे D.O. no. २-१६/२०२६ (CPP-II) (C.१७९४०२) दि. ०९.०६.२०२६ चे पत्र

एड्सवर पूर्णत्वाने मात करणे करीता कोणतेही औषध वा लस अद्यापी उपलब्ध नसल्यामुळे या रोगाला प्रतिबंध करणे हाच एकमेव उपाय सध्या उपलब्ध आहे. या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी भारतात केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम सन १९९२ पासून राबविण्यात येत आहे. राज्यात एड्स नियंत्रण कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटीची स्थापना माहे जुलै १९९८ मध्ये करण्यात आलेली आहे

नॅको, नवी दिल्ली यांच्या माहितीनुसार महाराष्ट्रामध्ये प्रौढ (१५ ते ४९) वयाच्या लोकांमध्ये एचआयव्ही चा प्रादुर्भाव हा ०.२९ % इतका आहे. तसेच एचआयव्ही/एड्स बद्दल व्यापक ज्ञान असलेले तरुण (१५ ते२४ वर्षे) यांचे प्रमाण फक्त ३७% इतके आहे. महाराष्ट्रात तरुणांमध्ये (१५ ते २४ वर्षे) एचआयव्हीचा भार १८ हजारांहून अधिक आहे. महाराष्ट्रात तरुणांमध्ये (१५ ते २४ वर्षे) दरवर्षी १००० हजारांहून अधिक नवीन एचआयव्हीचे रुग्ण सापडत आहेत. युवक-युवतींमध्ये एचआयव्हीचा संसर्ग होण्याचा जास्त धोका आहे. याचे मुख्य कारण म्हणजे युवकांची ऊर्जा, उत्साह आणि धोका पत्कारण्याची/बिनधास्त वर्तणूक असल्यामुळे त्यांचेमध्ये संसर्ग होण्याची शक्यता इतरांपेक्षा अधिक असते.

महाविद्यालयातील युवकांना एचआयव्हीबाबत माहिती देणे, लैगिंक वर्तन अधिक जबाबदार बनविणे, रक्तदानाचे महत्व विशद करणे आणि अधिक निकोप व निरोगी वातावरण तयार करणे यासाठी महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था (मराएनिसं) द्वारे राज्यातील महाविद्वद्यालयांमध्ये सन २०१० पासून

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था
(महाराष्ट्र शासन)
आर.ए.किडवाई मार्ग, ॲकवर्थ लेप्रसी कॉम्पलेक्स,
वडाळा(प.) मुंबई-४०००३१

आतापर्यंत अनुदानित १०३२ व विनाअनुदानित १९७० असे एकूण ३००२ रेड रिबन क्लब स्थापन केलेले आहेत. रेड रिबन क्लब मार्फत वर्षभर जनजागृती उपक्रम राबविण्यात येतात. त्यामध्ये महाविद्यालयीन युवकांचा सहभाग असतो. रेड रिबन क्लब मार्फत त्यांच्या महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात येते. तसेच त्यांच्याद्वारे इतर विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येतात. त्याअनुषंगाने, आपण आपल्या अधिपत्याखालील सर्व राष्ट्रीय सेवा योजना युनिट असलेल्या शासकीय, अनुदानित व खाजगी महाविद्यालयांमध्ये रेड रिबन क्लब (RRC) स्थापन करण्यासाठी संबंधित महाविद्यालयांना आवश्यक निर्देश देण्यात यावेत. तसेच त्याबाबतचा अनुपालन अहवाल महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेकडे iec_msacs@mahasacs.org हया ईमेल आयडीवर पाठवून देण्यात यावा.

आपल्या सहकार्याने युवकांमध्ये एचआयव्ही / एड्स विषयक जागरुकता वाढविणे व सन २०३० पर्यंत एड्स आजाराचा सार्वजनिक आरोग्याचा धोका म्हणून अंत करण्याच्या SDG 3.3 च्या उद्दिष्टांच्या पूर्ततेस हातभार लागेल.

डॉ.सुनील भोकरे, भा.प्र.से
आयुक्त, शहरी आरोग्य तथा प्रकल्प संचालक,
महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

१. मा.अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
३. क्षेत्रिय संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, रासेयो क्षेत्रिय संचलनालय (महाराष्ट्र व गोवा), पुणे

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
१० वा मजला, नवीन मंत्रालय, मुंबई ०१.

जा.क: मराएनिसं/माशिसं/आरआरसी/२५-२६/4649-81 दिनांक-१६ / ०९/२०२५

प्रति,

१) मा. अप्पर मुख्य सचिव उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) मा. अप्पर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यपूर्ण विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) मा. सचिव वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) कुलसचिव, सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
५) जिल्हाधिकारी, (सर्व)

विषयः **महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमध्ये व संलग्न महाविद्यालयांमध्ये एच.आय.व्ही/एड्स विषयी जनजागृती करण्यासाठी महाविद्यालय तिथे आरआरसी उपक्रमांतर्गत रेड रिबन क्लब स्थापन करण्याबाबत.**

महोदय,

एड्सवर पूर्णत्वाने मात करणे करीता कोणतेही औषध वा लस अद्यापी उपलब्ध नसल्यामुळे या रोगाला प्रतिबंध करणे हाच एकमेव उपाय सध्या उपलब्ध आहे. या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी भारतात केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम सन १९९२ पासून राबविण्यात येत आहे. राज्यात एड्स नियंत्रण कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटीची स्थापना माहे जुलै १९९८ मध्ये करण्यात आलेली आहे.

राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमाच्या पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या टप्प्यांच्या दरम्यान आलेल्या अनुभवावरुन एनएसीपी V चा कालावधी (सन २०२१-२०२६) अर्थात राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमाचा पाचवा टप्पा तयार करण्यात आला आहे. कार्यक्रमाची रचना, त्याची उद्दिष्टे, अंमलबजावणीचे प्राधान्यक्रम आदी सर्व गोष्टी ठरविताना विविध स्तरावर व्यापक प्रमाणात सल्लामसलत करण्यात आली आहे. वैद्यकिय क्षेत्रातील तज्ज्ञ, अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी, एचआयव्हीसह जगणाऱ्या व्यक्तींच्या संघटना, संशोधक, सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती या सर्वांपरोवर सर्वसमावेशक असा हा कृती कार्यक्रम तयार करण्यात आला आहे.

नॅको, नवी दिल्ली यांच्या माहितीनुसार महाराष्ट्रामध्ये प्रौढ (१५ ते ४९) वयाच्या लोकांमध्ये एचआयव्ही चा प्रादुर्भाव हा ०.२९% इतका आहे. तसेच एचआयव्ही/एड्स बद्दल व्यापक ज्ञान असलेले तरुण (१५ ते २४ वर्षे) यांचे प्रमाण फक्त ३७% इतके आहे. महाराष्ट्रात तरुणांमध्ये (१५ ते २४) वर्ष एचआयव्हीचा भार १८ हजारांहून अधिक आहे. महाराष्ट्रात तरुणांमध्ये (१५ ते २४ वर्ष) दरवर्षी हजारांहून अधिक नवीन एचआयव्हीचे रुग्ण सापडत आहेत. युवक

युवतीमध्ये एचआयव्हीचा संसर्ग होण्याचा जास्त धोका आहे. याचे मुख्य कारण म्हणजे युवकांची ऊर्जा, उत्साह आणि धोका पत्करण्याची/विनधास्त वर्तणूक असल्यामुळे त्यांच्यामध्ये संसर्ग होण्याची शक्यता इतरांपेक्षा अधिक असते.

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था (मसाएनिसं) द्वारे रेड रिबन क्लब मार्फत महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींपर्यंत एचआयव्ही/एड्स विषयी जनजागृती करण्यात येते. महाविद्यालयातील युवकांना एचआयव्हीबाबत माहिती देणे, लैंगिक वर्तन अधिक जबाबदार बनविणे, रक्तदानाचे महत्व विशद करणे आणि अधिक निरोगी वातावरण तयार करणे यासाठी राज्यातील महाविद्यालयांमध्ये सन २०१० पासून आतापर्यंत ९३२ रेड रिबन क्लब स्थापन केलेले आहेत. रेड रिबन क्लब मार्फत वर्षभर जनजागृती उपक्रम राबविण्यात येतात. त्यामध्ये महाविद्यालयीन युवकांचा सहभाग असतो. रेड रिबन क्लब मार्फत त्याच्या महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात येते तसेच त्यांच्याद्वारे इतर विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येतात. राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमामध्ये (एनएसएस) एच१आयव्ही/एड्स जनजागृतीकरिता विशेष प्राधान्य दिले तर एनएसएसद्वारे आयोजित उपक्रमामध्ये आणि कॅम्पच्या ठिकाणी त्यांच्याद्वारे व्यापक व प्रभावी जनजागृती होईल.

जागतिक एड्स दिन (०१ डिसेंबर) रोजी विद्यापीठ आणि महाविद्यालयात एचआयव्ही/एड्स विषयी जनजागृतीचे कार्यक्रम होतात. परंतु फक्त जागतिक एड्स दिनाच्या कार्यक्रमापर्यंत मर्यादित न राहता, मसाएनिसंकडून आंतरराष्ट्रीय युवा दिन (१२ ऑगस्ट) व राष्ट्रीय युवा दिन (१२ जानेवारी) साजरा करुन युवांमध्ये जनजागृती करण्यात येते. तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय येथे असलेल्या जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष (डापकू) यांचे मार्फत महाविद्यालयात जाऊन संवेदीकरण करण्यात येते.

आपल्या अंतर्गत असलेल्या सर्व विद्यापीठ व महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) मध्ये रेड रिबन क्लबच्या उपक्रमांचा समावेश करावा. तसेच ज्या महाविद्यालयात एनएसएस नाही त्या महाविद्यालयांना आंतरराष्ट्रीय युवा दिन व राष्ट्रीय युवा दिन आणि जागतिक एड्स दिन तसेच वर्षभर विविध उपक्रमाच्या माध्यमातून एचआयव्ही/एड्स बाबत जनजागृती करण्यात यावी. जेणेकरुन विद्यार्थी-विद्यार्थीनीमध्ये एचआयव्ही/एड्स, गुप्तरोग / प्रजनन मार्गातील संसर्ग (STI/RTI) हे आजार कसे होतात व कसे होत नाहीत तसेच आजाराला प्रतिबंध कसा करावा याबद्दल संपूर्ण माहिती होईल.

एचआयव्ही/एड्स आजाराचे देश व राज्यातून उच्चाटन करण्याकरिता आपल्या सहकार्याने येणाऱ्या नवीन पिढीला एचआयव्ही संसर्ग मुक्त करण्याकरिता महाविद्यालय तिथे रेड रिबन क्लब स्थापन करण्यासाठी आपल्या अधिनस्त अधिका-यांना कृपया सूचित करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

निपुण विनायक

डॉ. निपुण विनायक
सचिव - १
सार्वजनिक आरोग्य विभाग

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

प्रो. श्यामा रथ
सचिव

Prof. Shyama Rath
Secretary

सत्यमेव जयते

आज़ादी का अमृत महोत्सव

विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
(शिक्षा मंत्रालय, भारत सरकार)
(Ministry of Education, Govt. of India)

D.O.No. 2-16/2026(CPP-II) (C.179402) **19 ज्येष्ठ, 1948/ 9th June, 2026**

Subject: Strengthening collaboration for HIV prevention and control initiatives-reg.

आदरणीय महोदया/महोदय,

As you are aware, the Government of India is taking various initiative towards HIV prevention and control initiatives. A Memorandum of Understanding (MoU) was signed on 6th August 2013 between the Department of Higher Education and the National AIDS Control Organisation (NACO), Ministry of Health & Family Welfare, to promote HIV/AIDS awareness and voluntary blood donation through Red Ribbon Clubs (RRCs) in educational institutions. The initiative supports HIV/AIDS prevention activities in state educational institutions, including private universities, with technical assistance from the respective State AIDS Control Societies (SACS).

At present, over, 14,925 RRCs are functional in colleges across the country, reflecting the strength of this collaboration.

Building on this progress, the continued cooperation is solicited for further strengthening and scaling up programme activities. A communication addressed to Ministry of Education by National AIDS Control Organization, Ministry of Health & Family Welfare, Department of Health & Family Welfare is enclosed.

In this regard, all Higher Education Institutions are requested to take the following actions:

1. Inclusion of HIV/AIDS awareness and related activities in colleges, technical institutions and universities;

2. Appointment of a Complaints Officer in educational institutions and establishments, in accordance with the HIV and AIDS Policy for Establishments, 2022; and

3. Establishment of Red Ribbon Clubs in all Higher Education Institutions including private colleges and universities.

HEIs are also requested to disseminate the information widely for achieving the Sustainable Development Goal (SDG) of ending AIDS as a public health threat by 2030.

सादर,

भवदीय,

श्यामा रथ

(श्यामा रथ)

संलग्नक: उपरोक्तानुसार

सेवा में,

सभी विश्वविद्यालयों के कुलपति।

सभी महाविद्यालयों के प्राचार्य।